**प्रकल्प प्रवर्तक मे. गम्प्रो ड्रिलिंग फ्लुईड्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या गट नं. १८५, १९०, १९१, १९२, १९३, १९५/१, १९५/२, १९६, गाव-ढेकू, ताकई-आडोशी रोड, खोपोली, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड ४१०२०३, महाराष्ट्र येथील कार्यरत प्रकल्पात ऑईल वेल ड्रिलिंगसाठी लागणा-या स्पेशॅलिटी केमिकल्सच्या निर्मिती प्रकल्पाचे प्रस्तावित विस्तारिकरण संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचे इतिवृत-**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. गम्प्रो ड्रिलिंग फ्लुईड्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या गट नं. १८५, १९०, १९१, १९२, १९३, १९५/१, १९५/२, १९६, गाव-ढेकू, ताकई-आडोशी रोड, खोपोली, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड ४१०२०३, महाराष्ट्र येथील कार्यरत प्रकल्पात ऑईल वेल ड्रिलिंगसाठी लागणा-या स्पेशॅलिटी केमिकल्सच्या निर्मिती प्रकल्पाचे प्रस्तावित विस्तारिकरण संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी शुक्रवार दिनांक २४ मार्च, २०२६ रोजी दुपारी ०३.०० वाजता रिशिवन रिसॉर्ट, झा एन्ड असोशिएट्स, सर्व्हे नं. ८/१, पेण रोड, आडोशी-शिळफाटा, खोपोली, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड - ४१०२०३, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यात आलेली होती.

श्री प्रशांत भोसले, उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,रायगड भवन, ६ वा मजला, सेक्टर-११, सी.बी.डी. बेलापूर,नवी मुंबई – ४००६१४ तथा आयोजक पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री संदेश शिर्के, अपर जिल्हादंडाधिकारी, रायगड,अलिबाग तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री संजय भोसले, प्रादेशिक अधिकारी-रायगड, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,रायगड भवन, ६ वा मजला, सेक्टर-११, सी.बी.डी. बेलापूर,नवी मुंबई – ४००६१४ तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, स्थानिक लोकप्रतिनिधी, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी

व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देशच प्रकल्प परिसरातील जनतेस प्रकल्पाविषयी व प्रस्तावित प्रकल्पामुळे होणारे संभाव्य पर्यावरणीय परिणाम व प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती जनतेस देणे, त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे असा आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की **प्रकल्प प्रवर्तक मे. गम्प्रो ड्रिलिंग फ्लुईड्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या गट नं. १८५, १९०, १९१, १९२, १९३, १९५/१, १९५/२, १९६, गाव-ढेकू, ताकई-आडोशी रोड, खोपोली, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड ४१०२०३, महाराष्ट्र येथील कार्यरत प्रकल्पात ऑईल वेल ड्रिलिंगसाठी लागणा-या स्पेशॅलिटी केमिकल्सच्या निर्मिती प्रकल्पाचे प्रस्तावित विस्तारिकरण** संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी प्रकल्प प्रवर्तकांचा दिनांक २४.१२.२०२५ रोजीचा अर्ज मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्राप्त झाला.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित तरतुदींनुसार **संवर्ग ए – शेड्युल ५ (एफ) (सिंथेटिक ऑरगॅनिक केमिकल्स उद्योग) अंतर्गत** मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास तज्ज्ञ मुल्यमापन समिती (ईएसी), पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्राप्त करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक ०९.०७.२०२५ रोजी सादर केला व त्या अर्जास त्यास भारत सरकारने ऑनलाईन मंजूरी दिनांक १६.०७.२०२५ रोजी प्रदान केली.

त्यानुसार, प्रकल्प प्रवर्तकांनी भारत सरकारच्या निर्देशांनुसार नाबेट मंजूरी प्राप्त असलेल्या पर्यावरण सल्लागार यांची नियुक्त करून पर्यावरण सल्लागार यांच्याव्दारे प्रकल्प स्थानाच्या १०.० किमी त्रिज्येमध्ये तपशीलवार पर्यावरण सर्वेक्षण ०१ मार्च, २०२५ ते ३१ मे, २०२५ (तीन महिने) या कालावधीत पुर्ण करण्यात आले. प्रस्तावित प्रकल्प स्थापनेमुळे पर्यावरणावर होणा-या संभाव्य परिणामाचा/आघातांचा अभ्यास करण्यासाठी प्रकल्पाच्या जागेचा आणि पर्यावरण प्रभाव मूल्यांकन (EIA) अहवालाचा मसुदा तयार करण्यात आला आणि तो सादर करण्यात आला.

सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी पत्र क्रमांक एमपीसीबी/जेडी(डब्ल्यूपीसी)/इएनवी-पीएच/बी-२६०११३-एफटीएस-०२१५, दिनांक १३.०१.२०२६ नुसार उप प्रादेशिक कार्यालय, रायगड-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,६ वा मजला, सेक्टर-११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई यांना पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याची प्रक्रिया राबविण्याची सूचना केली.

उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड-१, रायगड भवन, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ६ वा मजला, सेक्टर-११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई यांनी पत्र दिनांक १३.०२.२०२६ रोजी मा. जिल्हाधिकारी, रायगड, अलिबाग यांना सदरहू प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याची विनंती केलेली होती.

मा. जिल्हाधिकारी, रायगड, अलिबाग यांनी त्यांच्या पत्र दिनांक २३.०३.२०२६ नुसार प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी शुक्रवार, दिनांक २४ एप्रिल, २०२६ रोजी दुपारी ०३.०० वाजता रिशिवन रिसॉर्ट, झा एन्ड असोशिएट्स, सर्व्हे नं. ८/१, पेण रोड, आडोशी शिळफाटा, खोपोली, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड - ४१०२०३, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यास मान्यता दिल्यानंतर मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश क्रं. बीओ/जेडी(डब्ल्यूपीसी)/पीएच/बी, दिनांक २१.०४.२०२६ अन्वये भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना एस.ओ. क्रं. १५३३, दिनांक १४.०९.२००६ व सुधारित अधिसुचना एस. ओ. ३०६७ (इ), दिनांक ०१.१२.२००९ अनुसार खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी,रायगड, अलिबाग,<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई<br>यांचे प्रतिनिधी —<br>प्रादेशिक अधिकारी - रायगड,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>रायगड भवन, ६ वा मजला,सेक्टर-११,<br>सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई — ४००६१४ | - | **सदस्य** |

३) उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-१. - **आयोजक**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
रायगड भवन, ६ वा मजला,सेक्टर-११,
सी.बी.डी.बेलापूर,
नवी मुंबई – ४००६१४

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक अधिकारी,रायगड-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, ६ वा मजला,सेक्टर-११,सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई – ४००६१४ यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्र दैनिक लोकमत आणि दैनिक कृषिवल यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत दिनांक २६.०३.२०२६ रोजी जनसुनावणी सूचना सर्व जनतेस अवगत करण्यासाठी प्रकाशित केलेली होती. तसेच सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज जनतेच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी खालील अधिसूचित (notified) कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते –

१) प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य झोन, न्यु सेक्रेटरीएट बिल्डिंग, तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन्स, नागपूर – ४४०००१.
२) मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड,अलिबाग,
३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, रायगड,अलिबाग,
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, रायगड,अलिबाग,
५) प्रांताधिकारी, प्रांत कार्यालय,खालापूर, तालुका-खालापूर,जिल्हा – रायगड,
६) तहसीलदार, तहसील कार्यालय,खालापूर तालुका- खालापूर, जिल्हा- रायगड,
७) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तालुका-खालापूर, जिल्हा-रायगड,
८) नगर पंचायत कार्यालय, खालापूर, जिल्हा-रायगड,
९) ग्रामपंचायत कार्यालये- ग्रुप ग्रामपंचायत- होनाड, ग्रामपंचायत कार्यालय- आडोशी,अत्करगाव, ढेकू, साजगाव,ठाणेन्हावे
१०) संचालक, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई – ४०००३२.
११) सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, सिनेप्लॅनेट सिनेमासमोर, ३ रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन सर्कलजवळ, सायन (पूर्व), मुंबई - ४०००२२

१२) प्रादेशिक अधिकारी - रायगड,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, ६ वा मजला, सेक्टर-११, सी.बी.डी.बेलापूर,
नवी मुंबई – ४००६१४,

१३) उप प्रादेशिक अधिकारी – रायगड-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, ६ वा मजला, सेक्टर-११, सी.बी.डी.बेलापूर,नवी मुंबई – ४००६१४

१४) संकेत स्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई – मराठी व इंग्रजी कार्यकारी सारांश अहवाल उपलब्ध केलेला आहे.

आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,रायगड-१, यांना एकही सूचना/आक्षेप प्राप्त झालेले नाहीत.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याची संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती फक्त लोकांचे पर्यावरणविषयक मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, प्रकल्प नाकारणे किंवा प्रकल्पाची शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. स्थानिक जनतेने जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची बैठकीच्या इतिवृतात नोंद घेण्यात येईल व बैठकीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीचे व्हिडिओ रेकॉर्डींग, जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना/आक्षेप, बैठकीचे इतिवृत्त हा सर्व दस्तावेज पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करण्यात येईल. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील

निर्णय घेते. आयोजक यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी (Environment Management Plan) सादरीकरण केले.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की भारत सरकारच्या "मेक इन इंडिया" या ध्येयाने प्रेरित होऊन प्रकल्प प्रवर्तक यांनी आपली उत्पादने वाढविण्याचा निर्णय घेतलेला आहे.

प्रकल्पाचे एकूण भूखंड क्षेत्र हे ३.१३ हेक्टर असून एकूण भांडवली गुंतवणूक ही ₹ ४१.६० कोटी एवढी असून विस्तारिकरणासाठी प्रस्तावित भांडवली गुंतवणूक ही २०.० कोटी रुपये आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशांनुसार प्रकल्पाच्या एकूण भूखंडाच्या ३३% हरितपट्टा विकसित करणे बंधनकारक आहे, त्यानुसार हरित पट्टा विकसित करण्यात येईल. प्रकल्पात कुशल आणि अकुशल संवर्गातील ७४ व्यक्तींची गरज असुन प्रकल्पातील रोजगारासाठी स्थानिकांनाच प्राधान्य देण्यात येईल. गम्प्रो कंपनीने महिला सक्षमीकरणावर म्हणजेच महिला कामगारांना २०% रोजगार उपलब्ध करुन दिलेला असून भविष्यातही तेच धोरण पाळण्यात येईल. मात्र सदरहू प्रकल्प स्थापनेमुळे परिसरातील अप्रत्यक्ष व्यवसायात प्रचंड प्रमाणात वाढ होईल.

प्रस्तावित प्रकल्प हा झेएलडी - झिरो लिक्विड डिस्चार्ज प्रकल्प असून प्रकल्पातील सांडपाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर सोडला जाणार नाही.

प्रकल्पाचे कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदारी अंदाजपत्रकासाठी सुमारे ₹ १०.० लाख गुंतवणार असून प्रकल्प बाधीत गावातच ते खर्च करण्यात येईल.

तसेच प्रस्तावित प्रकल्पाच्या पर्यावरण व्यवस्थापनसाठी प्रस्तावित भांडवली खर्च रु.६.१४ कोटी असून आवर्ती खर्च रु. ०.३१ कोटी एवढा असेल.

सदरहू प्रकल्प हा स्थानिक परिसर, महाराष्ट्र राज्य व देशाच्या हिताचा आहे.

सादरीकरण पुर्ण झाल्यानंतर सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी ,पर्यावरणविषयक सूचना, टीकाटिप्पणी, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले. सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम आपले नांव, गावाचे नांव सांगण्यात यावे.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१) **श्री अक्षय अशोक खेडेकर, राहणार-आतकरगाव,तालुका-खालापूर , जिल्हा-रायगड, पंचायत समिती अध्यक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेनाः-**

या प्रकल्पाचे विस्तारिकरण होत आहे, त्याचे आपण स्वागत करु या. जर विस्तारिकरण प्रकल्पामुळे स्थानिकांना, भूमीपुत्रांना रोजगाराची संधि मिळत असेल व सादरीकरणात दर्शविल्याप्रमाणे पूर्वी केल्यानुसार जर विविध सामाजिक कार्ये सीएसआर निधीअंतर्गत कंपनी भविष्यात करणार असेल, तर या प्रकल्पाचे स्वागतच आहे.

माझा एक प्रश्न आहे की सादरीकरणात विस्तारिकरण प्रकल्पासाठी औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र म्हणजे Effluent Treatment Plant संबंधीचे नियोजन सांगितलेले आहे. तर आमचा आक्षेप आहे की अनेक कंपन्यांमध्ये ईटीपी बांधण्यात येतात, झिरो लिक्विड प्लँटसुध्दा म्हणजे एम.बी. प्लँटसुध्दा बांधण्यात येतो, मात्र एम.बी. प्लँटमध्ये प्रक्रिया करण्याचा खर्च मोठ्या प्रमाणात असतो जो की कंपनीस परवडतच नाही. म्हणून तो चालविला जातच नाही. तर आपल्या प्रकल्पात तो एम.बी. प्लँट आहे काय?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की आपण उपस्थित केलेली सूचना आमच्या लक्षात आलेली आहे. आम्ही प्रकल्पात झेडएलडी प्रणाली कार्यान्वित करण्यात येणार आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी बंधनकारक केलेली ऑनलाईन मॉनिटरिंग प्रणाली प्रकल्पात कार्यरत आहे. त्याचे एक

कनेक्शन हे केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ, नवी दिल्ली व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या सर्व्हरला जोडलेले असते. जरी एखाद्या मापदंडाने (Parameters) पारित मानकांपेक्षा (prescribed standards) किंचित जास्त झाल्यास दोन्ही विभागांकडून प्रकल्प अधिका-यांना व प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांना एसएमएस त्वरित पाठविण्यात येतो. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळांचे अधिकारी त्वरित पाहणी करण्यास येतात. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळांचे अधिकारी हे पारित विशिष्ट कालवधीत पाहणी करण्यास येतात. प्रकल्पातील प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर जाणार नाही.

**श्री अक्षय अशोक खेडेकर** यांनी मत मांडले की झिरो लिक्विड डिस्चार्ज म्हणजे प्रकल्पाबाहेर प्रक्रिया केलेले सांडपाणी न सोडणे व त्याचा प्रकल्पातच पुनर्वापर करणे. तर ब-याच कंपन्यात झेडएलडी प्रणाली स्थापित करण्यात येते. पण तो फक्त दाखविण्यासाठीच उभारलेला असतो. तो चालवला जातच नाही, कारण तो खर्चिक आहे. तर तो चालविणार जाणार का?

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की उपस्थित व्यक्तीने अतिशय योग्य मुद्दा उपस्थित केलेला आहे. ब-याचठिकाणी ईटीपी बांधतात, पण तो कार्यान्वित (operation) करण्यातच येत नाही.

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की निश्चितच ईटीपी आणि झेडएलडी प्रणाली ही चालविली जाणार आहे.एक चांगली गोष्ट आहे की प्रकल्पात जी ऑईल बेस्ड उत्पादने व वॉटर बेस्ड उत्पादने आहेत, तर वॉटर बेस्ड उत्पादनातील द्रव्ये (liquid) हे पूर्णपणे १००%वापरले जाते, हे प्रकल्प व्यवस्थापनाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास दाखवून दिलेले आहे. आता आम्ही प्रकल्पातील प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा प्रकल्प उत्पादनातच पूर्ण वापर करणार आहोत.

**श्री अक्षय अशोक खेडेकर** यांनी आक्षेप नोंदविला की जरी प्रकल्पात ईटीपी कार्यरत ठेवण्यात आला, तरीही प्रक्रिया केलेले उरलेले सांडपाणी हे परिसरातील नदीनाल्यात सोडण्यात येते.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की तसे होणार नाही. आमचे इंटर्नल प्रोडक्ट्स असून प्रकल्पात उत्पन्न होणा-या सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा प्रकल्प उत्पादनात १००% पुनर्वापर करण्यात येणार आहे.

**श्री अक्षय अशोक खेडेकर** यांनी मत मांडले की तसे असल्यास आम्ही आपल्या प्रकल्पाचे स्वागतच करु.

**१) श्री सुरेश अर्चन पाटील, राहणार-ढेकू,तालुका-खालापूर,जिल्हा-रायगडः-**

माझी शेती फायबरच्या मागे आहे. गेले दोन वर्षे कंपनीशी पाठपुरावा करत आहे. ते केमिकलचे पाणी होते, मात्र आपण नाही म्हणालात. मी मागच्या गेटला गेलो होतो. तेथे सोनल कंपनीचे पाणी दाखविले. तुमच्या मागच्या गेटजवळील गटाराजवळ ते पाणी येत होते. सर्व केमिकलचे पाणी होते. ते पांढ-या रंगाचे केमिकलचे पाणी होते.

त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले बैठकीचे इतिवृत्त मंजुरीसाठी आणताना प्रथम स्थळ पाहणी करण्यात यावी. स्थळ पाहणी केल्यानंतर जर ठिक असेल, तरच पुढे अहवाल देण्यात यावा अशी सूचना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास केली.

**श्री सुरेश अर्चन पाटील यांनी तक्रार नोंदविली** की कंपनीचे एकही गटार साफ नाही. त्यामुळे आमच्या शेतात कामगार येतच नाही.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की प्रथम या कंपनीची जनसुनावणी पूर्ण करु, नंतर दुसरा विषय हाती घेऊ.

**२) श्री सुरज सुरेश पाटील, राहणार-ढेकू,तालुका-खालापूर,जिल्हा-रायगडः-**

सादरीकरणात दर्शविण्यात आलेले आहे की पर्यावरण प्रभाव मुल्यांकन अहवाल तयार करताना प्रकल्प स्थानाच्या १०.० कि.मी. परिघात सर्वेक्षण करताना आठ ठिकाणी बोअर वेल्सच्या (भूगर्भातील विहिरी) पाण्याचे नमुने घेण्यात आले. तर त्या त्या स्थानाचे गुगल मॅप फोटो आहेत काय?

येथे अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी जियो टेकचे फोटो दाखविण्याची सूचना केली.

त्यावेळी प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रत्येक स्थानाचे जियो टेक फोटोसुध्दा आहेत.

**श्री सुरज सुरेश पाटील यांनी** स्क्रीनवर फोटो दाखविण्याची मागणी केली.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्पाचा तयार करण्यात आलेल्या पर्यावरण प्रभाव मुल्यांकन (EIA) अहवालात चॅप्टर ३ पान नं. २३ वर दिलेले आहेत.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांनी केलेली मागणीनुसार ते अहवालात आहे काय? त्यांनी सांगितले की बोअऱवेलचे पाणी तपासण्यात आले त्याचे स्थान/जिओ टेक दाखविण्यात यावेत.

**श्री सुरज सुरेश पाटील यांनी मागणी केली की** ज्या ज्या बोअरवेलचे पाणी घेतले व चेक केले, त्या त्या चेक केलेल्या बोअरवेलचे लोकेशन, जिओ टेक सांगण्यात यावे.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की ती सर्व माहिती, जिओ टेक माहिती पर्यावरण प्रभाव मुल्यांकन अहवालात (ईआय़ए) दिलेली असून ती दाखविण्यात आली.

**श्री सुरज सुरेश पाटील यांनी** विचारणा केली की ढेकू गावामध्ये ०.४१ जिओटेक दाखविलेले आहे, ते कोठे आहे, त्याचे फोटो दाखविण्यात यावेत. त्यांनी आक्षेप नोंदविला हे कोठले आहे हे तुम्हाला सांगता येत नाही. येथील सर्व कंपन्यामधील पाण्याचे स्त्रोत हे प्रदूषित झालेले आहेत. येथील अवस्था बिकट आहे, सर्व केमिकल्सचे पाणी येते. मात्र अहवालात सांगतात की चांगल्या दर्जाचे बोअरचे पाणी आहे. ज्या प्रयोगशाळेत बोअरच्या पाण्याचे नमुने गोळा करण्यात आले, त्या प्रयोगशाळेचा पत्ता देण्यात यावा, त्यावर आम्ही फौजदारी गुन्हा, कायदेशीर कारवाई करु.

पर्यावरण सल्लागार यांनी खुलासा केला की ईआयए अहवालात ज्या स्थानावरुन (लोकेशनवरुन) आम्ही पाण्याचा नमुना गोळा केलेला आहे, तर आपण अक्षांश व रेखांश जर गुगल अर्थमध्ये टाकाल, तर आपणास गुगलचे अचूक स्थान/लोकेशन मिळेल. भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय,भारत सरकार, नवी दिल्ली यांनी प्रकल्पास पारित केलेल्या टी.ओ.आऱ. नुसारच एनएबीएल मान्यता प्राप्त प्रयोगशाळेतून बोअर विहिरींच्या पाण्याचे नमुने तपासण्यात आलेले आहेत.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी पर्यावरण सल्लागार यांना बोअरवेलच्या स्थानांचे फोटो व अहवालाची प्रत उपलब्ध करुन देण्याची सूचना केली.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की मा. अध्यक्षांच्या सूचनेनुसार ईआयए अहवालाची प्रत उपलब्ध करण्यात येईल.

**श्री सुरज सुरेश पाटील यांनी आक्षेप नोंदविला की** पर्यावरण सल्लागार सांगतात पाणी चांगले आहे, तर आम्ही आताही दाखवून दिले की ह्या हया बोअर विहिरीतून पाणी खराब येत आहे, तर या कंपनीवर आपण कायदेशीर कारवाई करणार का?

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की हे प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार आहेत. भारत सरकारच्या टी.ओ.आर च्या आदेशानुसार त्यांना सर्वेक्षणाचे आदेश देण्यात आलेले आहेत. तर पर्यावरण सल्लागार हे आपणास सॅम्पलिंग स्पॉट्स दाखवतील. त्याठिकाणी आपणास आक्षेपार्ह वाटले तर आपल्यासमोर ते सॅम्पल घेतील व त्याचा अहवाल आपणास देण्यात येईल.

येथे **श्री सुरज सुरेश पाटील यांनी आक्षेप नोंदविला की** आजही आमच्या येथील बोअर विहिरींना कंपनीच्या केमिकलमुळे पाणी खराब येत असेल तर त्याचा उपयोग आमच्या नागरिकांना होणार आहे काय? येते अध्यक्ष यांनी हया मुद्द्यांची नोंद घेण्यात आलेली असुन त्याचा इतिवृत्तात समावेश करण्यात येईल असे सांगितले.

**श्री सुरज सुरेश पाटील यांनी येथे परत आक्षेप नोंदविला की** जरी याची नोंद बैठकीच्या इतिवृत्तात घेण्यात येईल पण येथील अनेक बोअऱ वेल्स केमिकलमुळे खराब झालेल्या आहेत, आणि या विस्तारिकरण प्रकल्पामुळे त्यात भर पडणार आहे.

येथे अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आजची जनसुनावणीची प्रक्रिया आपण समजून घेणे आवश्यक आहे. ही समिती कुठल्याही प्रकल्पास परवानगी देत नाही, प्रकल्पास परवानगी नाकारत नाही किंवा एखाद्या प्रकल्पाची शिफारसही करत नाही. ही पर्यावरणविषयक जनसुनावणी आपण प्रस्तावित प्रकल्पाविषयी सूचना, विचार, टीकाटिप्पणी, हरकती नोंदविण्यासाठीच आहे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की सदरहू कंपनीमुळे येथील पाण्याचे स्त्रोत हे दुषित झालेले आहेत. त्याची नोंद रेकॉर्डिगमध्ये झालेली आहे. याची नोंद बैठकीच्या इतिवृत्तात घेण्यात येऊन शासनास कळविण्यात येईल. आपल्या सूचना व आक्षेप यांची नोंद घेण्यात येऊन त्याचा बैठकीच्या इतिवृतात समावेश करण्यात येईल. तो अहवाल मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे पर्यावरण, वने व हवामान

बदल मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली यांना सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत पुढील निर्णय घेईल.

**श्री सुरज सुरेश पाटील यांनी येथे मागणी केली की** माझी विनंती आहे की जेवढ्या जेवढ्या येथे बोअर वेल्स आहेत, तेथील पाण्याचे नमुने हे परत गोळा करण्यात यावेत किंवा आम्ही स्थानिक आपणास मदत करतो की कोणकोणत्या बोअर वेल्सचे पाणी दुषित आहे. त्या बोअरवेल्सच्या पाण्याचे नमुने घेण्यात यावेत. सूचनेची नोंद घेण्यात आली.

**३) श्री रोहित पाटील, राहणार-ढेकू,तालुका-खालापूर,जिल्हा-रायगडः-**

अध्यक्ष महोदय यांनी सांगितले की बैठकीत प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक सूचना किंवा आक्षेप हे उपस्थित करण्यात यावेत. त्यांची नोंद घेण्यात येईल. मात्र सदरहू पर्यावरणविषयक जनसुनावणीच्या आयोजनाबाबतची जनजागृत्ती ही स्थानिक गावात व प्रकल्प परिसरात करण्यात आलेली नाही. आमच्या येथे १५,००० लोक राहतात, मात्र येथे ५० लोकसुध्दा उपस्थित नाहीत. खूप लोकांना या कंपनीच्याविरुध्द तक्रारी करावयाच्या होत्या. पण त्यांना संधिपासून वंचित ठेवण्यात आले.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले आयोजक यांनी बैठकीच्यी सुरवातीसच जनजागृत्ती कशी करण्यात आली याची माहिती सांगितलेली आहे. पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी पर्यावरण प्रभाव मुल्यांकन (ईआय़ए) अधिसूचना, २००६ तील निर्देशांनुसार उप प्रादेशिक अधिकारी,रायगड-१ यांनी बैठकीच्या तीस दिवस अगोदर दोन स्थानिक वृत्तप्रतात मराठीत तर एक राष्ट्रीय वृत्तपत्रात इंग्रजीत लोकांच्या माहितीसाठी जनसुनावणी बाबत जाहिर सूचना प्रकाशित केलेली होती. त्याचप्रमाणे प्रस्तावित प्रकल्पाचा कार्यकारी सारांश अहवाल हा अधिसूचित शासकीय कार्यालयात, स्थानिक महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ कार्यालयात तसेच मंडळाच्या संकेतस्थळावर मराठी व इंग्रजीत उपलब्ध करण्यात आलेला होता.

तरीही स्थानिकांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सूचना किंवा आक्षेप नोंदविण्याचे असल्यास आपण लेखी स्वरुपता सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी सोमवार दिनांक २७ एप्रिल, २०२६ पर्यंत संध्याकाळी ५.०० वाजेपर्यत मुदत देण्यात येत आहे. आपण आपल्या लेखी सूचना/आक्षेप हे स्वह्स्ते, पोस्टाने किंवा ईमेलव्दारे जिल्हाधिकारी कार्यालय,रायगड,अलिबाग येथे सादर करु शकता.

त्यावेळी श्री रोहित पाटील यांनी परत आक्षेप नोंदविला की या जनसुनावणीची जनजागृत्ती होणे गरजेचे होते. त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की केंद्र सरकारने जे निर्देश पारित केलेले आहेत, त्या सर्व निर्देशांचे म्हणजे स्थानिक व राष्ट्रीय वृत्तपत्रात जाहिर सूचना प्रकाशित करणे याचे पालन करण्यात आलेले आहे. अध्यक्ष यांनी स्थानिक व राष्ट्रीय वृत्तपत्रांची नांवे विचारली. अध्यक्ष यांनी मत मांडले की स्थानिक लोक जो पेपर वाचतात, त्यात पर्यावरणविषयक जाहिर सूचना प्रकाशित करण्यात आलेली आहे. तरीही सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठीचा कालावधी मी वाढवून देत आहे. अजून सात दिवस मुदत देतो, आपण लोकांच्या, प्रकल्पबाधितांच्या सूचना,आक्षेप एकत्रित नोंदविण्यात याव्यात वा वैयक्तिक नोंदविण्यात याव्यात. सूचना, आक्षेप हे वैयक्तीक, पोस्टाने किंवा ईमेलव्दारे जिल्हाधिकारी कार्यालय,रायगड,अलिबाग यांना सादर करण्यात यावेत. ते शासनास सादर करण्यात येतील.

**४) श्री शुभम ज्ञानेश्वर पाटील, राहणार-चिंचोली,तालुका खालापूर, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, शाखाध्यक्षः-**

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून उद्योगास परवानगी देण्यात येते.ज्यावेळी उद्योगाकडून म.प्र.नि.मंडळाच्या पारित निर्देशांचे पालन करत नाही, त्यावेळी आम्ही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास कळवितो. मात्र महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ कोणतीच पुढील कार्यवाही करत नाही. माझ्या चिंचोली स्टॉपवर कमानी कंपनी आहे. गेले दोन दिवसांपूर्वी कमानी कंपनीने दोन टँकर्स ओतलेले आहेत. येथे सरपंच उपस्थित आहेत, त्यांचे हॉटेल हे तेथेच आहे. तेथील रस्त्यावर अत्यंत वास येत आहे. माझ्याकडे कमानी कंपनीबाबतचे व्हिडिओ आहेत. तसेच प्रसुल कंपनीबाबतचे व्हिडिओ आहेत.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आपले दुस-या कंपनीबाबत काही आक्षेप असल्यास या बैठकीनंतर आपणासोबत त्याबाबत चर्चा करण्यात येईल. या कंपनीचे -गमप्रो कंपनीचे असल्यास त्याची नोंद घेण्यात येईल.

**५) श्री सुरज सुरेश पाटील, राहणार-ढेकू,तालुका-खालापूर,जिल्हा-रायगडः-**

चर्चेमध्ये स्थानिकांच्या रोजगाराबाबत चर्चा करण्यात आली. सादरीकरणात असे दर्शविण्यात आले की प्रकल्पात स्थानिकांना रोजगाराची संधि देण्यात येईल. मात्र माझी विनंती रोजगार देताना ज्याच्याकडे कौशल्य व काम करण्याची तयारी असेल त्यांना संधि देण्यात यावी.

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की प्रकल्पात रोजगाराची संधि देताना स्थानिकांना निश्चितच प्राधान्य देण्यात येणार आहे. विस्तारिकरणामुळे प्रकल्पात ७०-८० व्यक्तींना रोजगाराची संधि प्राप्त होणार आहे. त्यासाठी स्थानिक युवक-युवतींसाठी प्रशिक्षण योजना तयार करुन त्यांना रोजगाराची संधि देण्यात येईल.

**श्री सुरज सुरेश पाटील, राहणार-ढेकू,तालुका-खालापूर,जिल्हा-रायगड** यांनी आक्षेप नोंदविला की पूर्वी येथील स्थानिक रोजगार व व्यवसायासाठी कंपनीने गेले असता व्यवस्थापनाने त्यांना संधि नाकारलेली आहे. तसे होऊ नये ही सूचना देत आहे. प्रकल्प प्रवर्तक यांनी सहकार्याचे आश्वासन दिले.

**६) श्री प्रतिक यशवंत लाळे, राहणार-ढेकू, पोस्ट-साजगाव, तालुका-खालापूर,जिल्हा-रायगडः-**

ही कंपनी जेथे उभी आहे, तेथील आम्ही स्थानिक भूमीपुत्र आहोत. असे असूनही आम्हां भूमीपुत्रांना रोजगाराच्या संधिपासून डावलण्यात आलेले आहे. आज आमची सुपिक जमिन गावासाठी कंपनीस दिली, मात्र येथील भूमीपुत्रांना कंपनीतील व्यवसाय/कंत्राटे, रोजगार याबाबत डावलण्यात आलेले आहे. मात्र परप्रांतीय आपल्याकडे लेबर कंत्राटदार आहेत.

प्रकल्प प्रवर्तक यांनी मत मांडले की जरी ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी असली, तरीही आपण उपस्थित केलेल्या सूचना निश्चितच सकारात्मक विचार करण्यात येईल.

येथे अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की स्थानिकांनाच प्राधान्य देण्यात यावे. स्थानिकांचे म्हणणे रास्त आहे. जमिनी त्यांच्या जातात, त्यांचे पर्यावरण खराब होणार, अडचणींचा सामना ते करणार, मात्र बाहेरचे लोक येऊन पोट भरणार. तरी स्थानिकांनाच प्राधान्य देण्यात यावे. आणि नुसते आश्वासन न देता याबाबत कालबध्द योजना आखण्यात यावी.

श्री प्रतिक लाळे यांनी सांगितले स्थानिकांनी दरवेळी सहकार्य केलेले आहे. तरी प्रत्येकास संधि देण्यात यावी.

प्रकल्प प्रवर्तक यांनी आश्वासन दिले की विस्तारिकरण प्रकल्पात रोजगार, व्यवसाय याबाबत स्थानिकांना निश्चितच प्राधान्य देण्यात येईल.

**७) श्री रोहित पाटील, राहणार-ढेकू,तालुका-खालापूर,जिल्हा-रायगडः-**

आजच्या स्थितीला किती कामगार हे स्थानीक आहेत?

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की ही पर्यावरणविषयक जनसुनावणी असल्याने ती माहिती येथे संकलीत करण्यात आलेली नाही. मात्र आपणास वैयक्तिकरित्या निश्चितच उपलब्ध करण्यात येईल.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सूचना केली ही बैठक संपल्यानंतर संबंधितांना माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

८) **श्री चंद्रकांत बबन पाटील, राहणार-ढेकू,तालुका-खालापूर,जिल्हा-रायगडः-**

आमच्या गावात आमचे पर्यावरणाचे प्रश्न ऐकण्यासाठी आल्याबद्दल पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीचे आभार. आता गम्प्रो कंपनीच्या विस्तारिकरणासाठी ही बैठक आयोजित करण्यात आलेली आहे. तर गम्प्रो कंपनी, सोनल व इतर कंपन्या एवढे हवा प्रदूषण करतात/धूर सोडतात की संध्याकाळी ७.०० नंतर आम्हांला नैसर्गिक श्र्वास घेणे शक्य होत नाही. येथील नागरिकांचे जीवन हे अक्षरशः धोक्यातच आहे. तसेच संध्याकाळी कपडे ठेवले असल्यास सकाळी त्यावर ऑईलचे बबल्स असतात.

तसेच या सर्व कंपन्या त्यांची रसायने (केमिकल्स) ज्या टाकीत साठवण करतात, त्याची सुरक्षितता तपासली जाते का? त्याबाबत माहिती द्यावी. संध्याकाळच्या प्रदूषणाचा आजही नागरिकांना त्रास होत आहे. या कंपनीच्या विस्तारिकरणामुळे असा त्रास होईल का याबाबत माहिती देण्यात यावी.

पुढील विनंती आहे की पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीत सूचना/आक्षेप नोंदविण्यासाठी स्थानिकांना वेळ देण्यात यावा, तरी ही विषय १०-१५ दिवस तात्पुरता स्थगित (hold) ठेवण्यात यावा. कारण आमच्या गावातील लोकांना येता आले नाही. तसेच या कंपनीचे प्रदूषण झाल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले आपण संध्याकाळी ७.० नंतर नैसर्गिक श्वास घेता येत नाही व नागरिकांचे जीवन धोक्यात आहे अशी टीकाटिप्पणी केलेली आहे. तसेच कपड्यांवर ऑईल्सचे बबल दिसतात हे सांगितले.

तर त्यास असे स्पष्टीकरण देण्यात येते की प्रकल्पात स्थापित करण्यात आलेली चिमणी (स्टॅक) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पारित केलेल्या मानकांनुसारच असते. त्यानुसारच विस्तारिकरण प्रकल्पातही तशी उंची ठेवण्यात येईल. तसेच प्रकल्पातील डी.जी.सेटची उंची ही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पारित केलेल्या मानकांनुसारच असते.

त्यावेळी सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी स्पष्टीकरण दिले की जरी पर्यावरण सल्लागार यांनी

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पारित केलेल्या मानकांनुसारच चिमणीची उंची ठेवण्यात येईल असे सांगितले आहे, तर ते केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या पारित मानकांनुसार समजावे. सदस्य यांनी सांगितले हा अहवाल केंद्र शासनास सादर करण्यात येतो. तेथील तज्ज्ञ समिती आपण उपस्थित केलेल्या पर्यावरणीय सूचना,आक्षेप याची नोंद घेऊनच प्रकल्पास पर्यावरण अनुमती (ईसी) मंजूर करायची वा नाही याबाबत पुढील निर्णय घेत असते.

त्यावेळी **श्री चंद्रकांत बबन पाटील, राहणार-ढेकू,तालुका-खालापूर,जिल्हा-रायगड यांनी सांगितले की** गाव आहे पूर्वेला, तर कंपनी आहे पश्चिमेला. संध्याकाळी पश्चिमेचा वारा सुरु होतो, त्यामुळे आम्हांला त्रास होतो.

सदस्य यांनी सांगितले की सूचनेचा नोंद घेण्यात आलेली आहे.

९) **श्री राकेश जळगावकर, राहणार-ढेकू,तालुका-खालापूर,जिल्हा-रायगडः-**

मी गम्प्रो कंपनीस धन्यवाद देतो की तुम्ही कोविड काळात सहकार्य केलेले आहे. आता कंपनीने विस्तारिकरणाच्या प्रस्तावासाठी ही जनसुनावणी आयोजित केलेली आहे. तर कंपनीचे क्षेत्र किती आहे, प्रकल्पात झाडे किती आहेत, तुमचा केमिकल प्रकल्प आहे, तर प्रदूषणाला थांबविण्यासाठी कोणती झाडे लावलेली आहेत? कंपनीचे क्षेत्रफळ किती, त्यात किती क्षेत्रात बांधकाम करण्यात आले?

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्पाचे क्षेत्रफळ ३.१३ हेक्टर आहे. श्री राकेश जळगावकर यांनी विचारणा केली की त्यात आपले बांधकाम किती आहे? माझ्या माहितीनुसार एक एकर जागा असल्यास २० गुंठे परवानगी मिळते, मग ते जिल्हाधिकारी कार्यालय,एमएसआरडीसी असो, तर आपले बांधकाम किती, त्यात किती झाडे लावण्यात आलेली आहेत व ती कोणत्या प्रकारची झाडे आहेत?

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांना सांगितले की प्रकल्पाचे एकूण क्षेत्र आहे ३.१३ हेक्टर. त्याच्या ३३% हरितपट्टा विकसित करण्यात येईल, म्हणजे २५८३ झाडांची लागवड करण्यात येईल. विद्यमान प्रकल्पात ७८ झाडांची लागवड करण्यात आलेली आहे. म्हणजे २५०५ रोपे हे लावण्यात येतील.

यात स्थानिक प्रजाती आहेत — त्यात कडुनिंब, निंब, करंज, दुमर, तामर, टेकोवा व स्थानिक रुंद पानांची झाडांच्या लागवडीस प्राधान्य देण्यात येईल. कारण रुंद पानांमुळे प्रकल्पात जे उत्सर्जन होते, ते कमी करण्यास व ध्वनी प्रदूषण कमी करण्यास मदत करते.

श्री राकेश जळगावकर यांनी आक्षेप नोंदविला की जर आता पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीने जर प्रकल्पास भेट व पाहणी केली, तर पर्यावरण खाते आपणास परवानगी देणारच नाही.

येथे अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उप प्रादेशिक अधिकारी कार्यालय,रायगड-1 यांना स्थळ पाहणी करुन कंपनीने दिलेली माहिती तपासण्याची- झाडे किती लावली ते तपासण्याची व अहवाल तयार करण्याची सूचना केली.

१०) **श्री सुरज सुरेश पाटील, राहणार-ढेकू,तालुका-खालापूर,जिल्हा-रायगडः-**

**श्री सुरज सुरेश पाटील** यांनी आक्षेप नोंदविताना सांगितले की प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्पाचे एकूण क्षेत्रफळ हे ३.१३ हेक्टर आहे. तर प्रस्तावित प्रकल्प हा ०.४७ हेक्टरमध्ये उभारला जाणार आहे. मग विद्यमान प्रकल्प जास्त आहे का प्रस्तावित प्रकल्प जास्त आहे? विद्यमान प्रकल्प क्षेत्रफळाने जास्त असूनही फक्त ७८ झाडे लावण्यात आली. त्यावेळी २,५०० झाडे लावणे आवश्यक होते. तर एवढी कमी झाडे कशी लावण्यात आली.

पर्यावरण सल्लागार यांनी स्पष्टीकरण दिले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने वेळोवेळी पारित केलेल्या "प्रकल्प स्थापना संमतीपत्र" (Consent to Establish — C to E) व "प्रकल्प कार्यान्वित संमतीपत्र"(Consent to Operate — C to O) नुसार उदघृत्त करण्यात आलेल्या अटी व शर्तींनुसार प्रकल्प प्रवर्तकांनी हरितपट्टा विकसित केलेला आहे.

तर प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पात पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली यांनी पारित केलेल्या पर्यावरण प्रभाव मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार (ईआयए, २००६) ३३% हरितपट्टा विकसित करणे हे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

त्यानुसार प्रकल्पात हरितपट्टा विकसित/झाडे लावण्यात येतील. त्यानुसार प्रकल्प प्रवर्तकांना २,५०५ झाडे सार्वजनिक जागी लावणे व त्यांचे संवर्धन करणे बंधनकारक आहे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उप प्रादेशिक कार्यालय-रायगड-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना सूचना केली की पाहणी करताना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पारित केलेल्या प्रथम संमतीपत्राच्या निर्देशांनुसार तेवढी झाडे आहेत काय हे तपासण्यात यावे. जरी भविष्यात प्रकल्प प्रवर्तक चांगले करतीलसुध्दा, पण त्यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पारित केलेल्या संमतीपत्रांचे (Consent to Establishment & Consent to Operate) निर्देश/ Norms पाळलेले आहेत की नाही हे तपासण्यात यावेत.

**श्री सुरज सुरेश पाटील** यांनी आक्षेप नोंदविला की त्यावेळेसच यांनी जर झाडे लावण्याचे निर्देश पाळले नाहीत, तर आता काय पाळणार? प्रकल्प प्रवर्तक आताच टाळाटाळ करत आहेत. तरी प्रकल्पाची पाहणी करताना स्थानिकांनाही बरोबर घेण्याची मागणी करत आहेत.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी स्पष्टीकरण दिले की स्थानीकांना बरोबर घेऊन पाहणी करण्याची कायद्यात तरतुद नाही.

**अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री योगेश गोरे, क्षेत्र अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना मंगळवार दिनांक २८ एप्रिल, २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता कंपनीत जाऊन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पारित केलेल्या संमतीपत्रांचे (Consent to Establishment & Consent to Operate) निर्देश/ Norms नुसार झाडे लावलेली आहेत काय वा नाही हे तपासण्यात येऊन त्याचा अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. तसेच कंपनीच्या मुख्य दरवाजासमोर ११.०० वाजता जाऊन जे स्थानिक आले असतील, त्यांच्या म्हणणे ऐकून नंतर कंपनीत जाऊन पाहणी करण्यात यावी.**

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना/आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली असून त्याचा इतिवृतात समावेश करण्यात येईल. तसेच मा. अध्यक्ष यांच्या सूचनेनुसार ज्यांना लेखी निवदने,सूचना वा आक्षेप नोंदवावयाची असतील, तर ती त्यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, नवी मुंबई येथे प्रत्यक्ष किंवा ईमेलव्दारे सादर करावीत. बैठकीच्या इतिवृत्तासोबत ती शासनास सादर करण्यात येतील.

मा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की ज्यांना ईमेलव्दारे सूचना/आक्षेप नोंदवावयाचे आहेत, ते त्यांनी **collectorraigad@gmail.com** या ईमेलवर सादर करावेत. सूचना/आक्षेप टपालव्दारे पाठविले तरी चालतील किंवा श्री योगेश गोरे, क्षेत्र अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, नवी मुंबई यांना मंगळवारी प्रत्यक्ष दिली तरी चालतील.

**११) श्री विनोदानंद कवळे, सरपंच, ग्रुप ग्रामपंचायत साजगाव,तालुका-खालापूर,जिल्हा-रायगडः-**

या गम्प्रो ड्रिलिंग फ्लुइड्स कंपनीने जे विस्तारिकरण योजिलेले आहे, त्याचे मी स्वागत करतो. वेळोवेळी त्यांनी पर्यावरणसुध्दा पाहिलेले असून सीएसआर अंतर्गत वृक्षलागवडीसाठी वेळोवेळी मदतसुध्दा केलेली आहे. पर्यावरणपुरक म्हणजे आंगणवाडीला गोबर गॅस म्हणजे कच-यापासून अन्न शिजविणे.

त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही आक्षेप असल्यास ते नोंदविण्याचे आवाहन केले.

**श्री विनोदानंद कवळे, सरपंच, ग्रुप ग्रामपंचायत साजगाव,तालुका-खालापूर,जिल्हा-रायगड** यांनी सांगितले की विस्तारिकरण प्रकल्पाचे स्वागत आहे.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सूचना, विचार, टीकाटिप्पणी किंवा आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना सांगितले की मा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सूचना/आक्षेप नोंदविण्यास मुदत दिलेली असल्याने आपण महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या रायगड भवन, नवी मुंबई येथील कार्यालयात प्रत्यक्ष किंवा मेलव्दारे sroraigad१@mpcb.gov.in यावर सादर करु शकता. किंवा मंगळवारी दिनांक २८ एप्रिल, २०२६ रोजी मप्रनि मंडळाच्या प्रतिनिधी प्रकल्पाच्यसमोर प्रत्यक्ष सादर करु शकता. बैठकीच्या इतिवृत्तासोबत ते केंद्र सरकारला सादर करण्यात येतील.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या वतीने जनसुनावणी संपन्न् झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्ष यांचे आभार मानून जनसुनावणी संस्थगित करण्यात आली.

सोबत एकही हरकती/आक्षेप आलेले नाहीत.

**(प्रशांत भोसले)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
रायगड-१,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
सीबीडी बेलापुर, नवी मुंबई

**(संजय भोसले)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
रायगड.

**(संदेश शिर्के)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, रायगड, जिल्हा – रायगड